शासन ज्ञापन, क्रमांक-एलआरएफ-२६०५/१९८/प्र.क्र. २१६१/ज-३

महसूल व वन विभाग,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक ६ सप्टेंबर, २००७

विषय- जमीन- मुंबई उपनगर जिल्हा

प्रगती मित्र मंडळ या संस्थेस मौजे मुलुंड, नभूक्र १४१८ मधील

४९८.७ चौ. मी. रुग्णालयासाठी भाडेपट्ट्याने देण्यात आलेली

जमीन कब्जेहक्काने देणे बाबत...

:

**शासन ज्ञापन :-**

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना त्यांचे पत्र क्रमांक-२९/ २ डी/एल-६१०, दिनांक २
जून, २००६ तसेच विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना त्यांचे पत्र क्रमांक-
नशा/कार्या-२/जमिन-३/कावि-१९५१/२००५, दिनांक १३ ऑक्टोबर, २००६ च्या अनुषंगाने,
विज्ञप्तीपूर्वक कळविण्यात येते की, मौजे मुलुंड, नभूक्र १४१८ मधील मुंबई महानगरपालिकेच्या मंजूर
विकास आराखड्यात रुग्णालयाकरीता आरक्षित असलेली ४९८.७ चौ. मी. इतकी जमीन शासन
ज्ञापन, महसूल व वन विभाग, क्रमांक- एलएनडी-२६८८/१४२०/प्र.क्र. १९०५/ज-३, दिनांक २
एप्रिल, १९९९ अन्वये २० वर्षांच्या भाडेपट्ट्याने, श्री प्रगती मित्र मंडळ या संस्थेस रुग्णालासाठी मंजूर
करण्यात आली होती. सदर जमिनीचे मुल्यांकन रुपये १६,०००/- प्रती चौ. मी. इतके निश्चित करुन
शासनाने दिनांक २६/१०/२००३ च्या ज्ञापनान्वये मान्यता दिलेली आहे. तथापि संस्थेने
त्यांच्या दिनांक ६ ऑक्टोबर, २००६ रोजीच्या निवेदनान्वये सदर जमिनीचे मुल्यांकन कमी
करण्याची, तसेच सन १९८३ च्या मुल्यांकनानुसार कब्जेहक्काची किंमत आकारुन जमीन देण्याची
संस्थेने केलेली विनंती अमान्य करण्यात येत असून संस्थेने सदर जमीन कब्जेहक्काची किंमत
आकारुन मिळण्याची केलेली विनंती मान्य करण्यात येत आहे. त्यानुसार शासन निर्णय, महसूल व
वन विभाग, क्रमांक- एलआरएफ-१०९२/प्र.क्र. ८५/ज-१, दिनांक २० जुलै, १९९२ मध्ये दिलेल्या
तरतुदीनुसार मौजे मुलुंड, नभूक्र १४१८ मधील ४९८.७ चौ. मी. क्षेत्राची चालू बाजारभावाची
शिघ्रसिद्ध गणकानुसार होणा-या किंमतीच्या ५०% इतकी रक्कम आकारुन उक्त जमीन या
आदेशाच्या दिनांकापासून प्रगती मित्र मंडळ या संस्थेस कब्जेहक्काने प्रदान करण्यास पुढील
अटी/शर्तीवर तसेच जिल्हाधिकारी यांना योग्य वाटतील अशा अटी/शर्तीवर शासन मंजुरी देण्यात येत
आहे.

lease-branch pl. recover rent immediately & then transfer the case to the concerned desk

14/9

[stamp] 12 [illegible] 201 / 22278 / III-D

WS-130

Scanned by CamScanner

**अटी :- १)** सदर जमीन संस्थेस भाडेपट्टयाने दिली असल्याने या आदेशाच्या दिनांकापर्यंत [illegible] भाडेपट्टयाची रक्कम संस्थेकडून वसूल करण्यात यावी. सदर रक्कम संस्थेने शासन [illegible] केल्यानंतरच जमिन कब्जेहक्काने मंजूर करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(स्वाक्षरी)

( वि. सि. वखारे )

अवर सचिव

महसूल व वन विभाग

प्रति,

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा
प्रशासकीय इमारत,
बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१

प्रतिलिपी :-

१) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई
२) जमाबंदी आयुक्त व संचालक भूमी अभिलेख, पुणे
३) उपसंचालक, भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई
४) सहाय्यक संचालक, नगर रचना व मुल्य निर्धारण विभाग, मुंबई उपनगर जिल्हा.
५) महालेखापाल, (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई
६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई
७) वित्त विभाग, व्यय-९, मंत्रालय, मुंबई.
८) ज-३ कार्यासन (निवडनस्ती), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

Scanned by CamScanner

(143)

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१
Ph 6556799, 6550111
Fax : 6556805
email address:- collrmsd@yahoo.com

(1105)

क्र. :-सी/कार्या-२/२ अ/जमिन/कावि-९७१/एल-६१०/०८
दिनांक :- १६ /१०/२००९

वाचले :- १) शासन ज्ञापन क्र. एलआरएफ-२६०५/१९८/प्र.क्र.२१७१/ज-३ दि. ०६/०९/२००७.

२) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे पत्र क्र. सी/कार्या-२ अ/एल-६१०/०८ दि. ०६/०५/२००८.

३) श्री प्रगती फाऊंडेशन यांचे दि. २७/०३/२००८ व दि. २३/०७/२००८ चे पत्र.

**आदेश :-**

मौजे मुलुंड, ता. कुर्ला येथी न.भू.क्र. १४१८ मधील मुंबई महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखडयात रुग्णालयाकरीता आरक्षित असलेली ४१८.७ चौ.मी. इतकी जमिन शासन ज्ञापन महसूल व वन विभाग क्र. एलएनडी-२६२८/१४२०/प्र.क्र.१९०५/ज-३ दि. २९ एप्रिल १९९९ अन्वये ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने श्री प्रगती मित्र मंडळ या संस्थेस रुग्णालयासाठी मंजूर करण्यात आली होती. सदर जमिनीचे मुल्यांकन रुपये १६०००/- प्रति चौ.मी. इतके निश्चित करुन त्यास शासनाने दि. २६/१०/२००६ च्या ज्ञापनान्वये मान्यता दिलेली आहे. तथापि, संस्थेने त्यांच्या दि. ६ ऑक्टोबर २००६ रोजीच्या निवेदनान्वये सदर जमिनीचे मुल्यांकन कमी करण्याची तसेच सन १९८३ च्या मुल्यांकनानुसार कब्जेहक्काची किंमत आकारुन जमिन देण्याची संस्थेने केलेली विनंती शासनाने अमान्य केलेली असून संस्थेने सदर जमिन कब्जेहक्काची किंमत आकारुन मिळणेची विनंती शासन ज्ञापन क्र. एलआरएफ-२६०५/१९८/प्र.क्र.२१७१/ज-३ दि. ०६/०९/२००७ अन्वये मान्य करणेत आलेली आहे.

त्यानुसार शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. एलआरएफ-१०९२/प्र.क्र.८५/ज-१ दि. २० जुले १९९२ मध्ये दिलेल्या तरतूदीनुसार मौजे मुलुंड, न.भू.क्र. १४१८ मधील ४१८.७ चौ.मी. क्षेत्राची चालू बाजारभावाची शिघ्रसिध्द गणकानुसार होणाऱ्या किमतीच्या ५०% इतकी रक्कम आकारणी करुन पुढील अटी/शर्तीवर मंजूरी देण्यात येत आहे.

१) शिघ्रसिध्द गणकानुसार सदर जमिनीचे चालू बाजारभावाप्रमाणे एकुण मुल्यांकनापैकी ५०% होणारी रक्कम रुपये ३९,२७,२६३/- (अक्षरी रुपये एकोणचाळीस लक्ष सत्तावीस हजार दोनशे त्रेसष्ठ मात्र) रक्कम संस्थेने धनादेश क्र. ६०६८८५ कार्पोरेशन बँक दि. १५/०५/२००८ अन्वये शासनास अदा केली आहे. तसेच संस्थेस यापूर्वी भाडेपट्टयाने दिलेल्या सदर जागेची संपूर्ण रक्कम शासन भरणा केलेली आहे.

२) सदर जमिन संस्थेस रुग्णालयासाठी मंजूर करणेत आलेली असल्याने या जागेचा वापर फक्त हॉस्पिटलसाठीच केला जाईल. यापूर्वी दकलीन क्र. २९/३ डी/एल-६१० दि. १९/०४/२००२ रोजी निर्गमित केलेल्या आदेशातील सर्व अटी /शर्ती संस्थेस बंधनकारक राहतील.

३) संस्थेने अटी/ शर्ती बाबतचा करारनामा निष्पादित करणेत यावा.

(सही)
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हाकरिता

प्रति,
श्री प्रगती मित्र मंडळ,
जानकी निवास,
गणेश गावडे रोड,
मुलुंड (प.), मुंबई क्र. ८०

प्रत :-

१) मा. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचे शासन क्र. एलआरएफ-२६०५/ १९८/ प्र.क्र.२१०१/ ज-३ दि. ०६/०९/२००७ अन्वये माहितीकरीता सादर

2) मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन यांचे क्र. मशा/कार्या-२/जमिन-३/कार्य-१९५१/२००५ दि. १३/१०/२००६ अन्वये माहितीकरीता सादर

3) तहसिलदार, कुर्ला/ नगर भूमापन अधिकारी, मुलुंड यांस

२/- प्रश्नांकित जागेचा ताबा संस्थेस यापूर्वीच आपलेकडून देणेत आलेला आहे. तथापि आता संस्थेस जागा कब्जेहक्काने प्रदान करणेत आलेली असल्याने त्याप्रमाणे गावचे अभिलेखात योग्य त्या नोंदी/ फेरफार करुन सुधारीत उतारे सादर करावेत यावेत.

(सही)
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हाकरिता

स्थळप्रतीवर जिल्हाधिकारी यांची सही असे

Rd.
For Pragati Foundation
(sign) Trustee 16/10/09

(सही) 11/11/09

ISSUED



Scanned by CamScanner